# == अनुक्रमणिका ==


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| अनुक्रमणिका | ३ |
| दुसऱ्या आवृत्तीबद्दल थोडेसे | ५ |
| निवेदन | ६ |
| प्रस्तावना | ८ |
| १ पहिली माही ओवी | २५ |
| २ सोडा वाट कृष्णदेवा ! | २६ |
| ३ यमुनेचं पाणी थोडं | २८ |
| ४ वेणी घातली हातांनी | ३० |
| ५ पंढरी बहू लांब | ३१ |
| ६ पंढरपुरांत | ३२ |
| ७ सीता गेली वनवासा | ३४ |
| ८ झाले सार रातोराती | ३६ |
| ९ जळे लंका रावणाची | ३८ |
| १० गुरूपूजा | ३९ |
| ११ कुठं उचलला मठ | ४१ |
| १२ देवाच्या देवळात | ४२ |
| १३ उगवला नारायण | ४४ |
| १४ पाणी वरून पडते | ४५ |
| १५ सकाळच्या प'हरी | ४६ |
| १६ पाहे वाट गोविंदाची | ४८ |
| १७ लाल महालाचा दिवा | ४९ |
| १८ केले दान जाते वाया | ५० |
| १९ भावांनी बहिणी नेल्या | ५१ |
| २० बाळ पोटी सामावला | ५२ |
| २१ नेले अशुद्ध डोण्यात | ५३ |
| २२ मोठ्याचा नवरदेव | ५५ |
| २३ नार पुत्रानं भाग्यवंत | ५६ |
| २४ कोणी पाहिला सुखात | ५७ |
| २५ करे नार येरझारा | ५८ |
| २६ जिलवी तार तोडे | ५९ |
| २७ माहेरा गेली राणी | ६० |
| २८ झाल्या तिन्ही सांजा | ६१ |
| २९ सखू बहीण सतीची | ६२ |
| ३० कुंडाची महती मोठी | ६३ |
| ३१ सखा माहा गेला वाया | ६३ |
| ३२ भरल्या बाजारात | ६४ |
| ३३ गोरीनं छंद केला | ६६ |
| ३४ कसारीण बाईस | ६७ |
| ३५ घाले कोण रोज फेरी | ६८ |
| ३६ वरमाय जागी करा | ६९ |
| ३७ उपाशी गेले दादा | ७० |
| ३८ गोरीला लागे पान | ७१ |
| ३९ पितळी पलंग | ७२ |
| ४० गाळे आसू मोरावाणी | ७३ |
| ४१ पारध्या दादास | ७५ |
| ४२ डोळा भरून पाहीन | ७६ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ४३ पुढं पारणं फिटलं | ७८ |
| ४४ नीळकंठ झाडावर | ८० |
| ४५ उजेड महालात | ८२ |
| ४६ शेजारीण बाईस | ८४ |
| ४७ गावाला गेले बाई | ८५ |
| ४८ गाईचं गोठाणं | ८७ |
| ४९ नाही कपाळ रंगलं | ८८ |
| ५० माहा जीव गेला | ९१ |
| ५१ पूस पाय रुमालानं | ९३ |
| ५२ मोजे वाघिणीच्या दाढा | ९४ |
| ५३ जाणं शेवटी एकलं | ९६ |
| ५४ जाळी उरल्याची गुंफ | ९७ |
| ५५ माझे दोन्हीकडे नेत्र | ९९ |
| ५६ भाऊजी म्हणा राम | १०१ |
| ५७ एका कुशोचे वैरी झाले | १०२ |
| ५८ मिठाची झाली लाही | १०४ |
| ५९ करे शेवट साजरा | १०६ |
| ६० अहुळी मरण | १०७ |
| ६१ माळयाच्या वाडीत | १०८ |
| ६२ राखण देव शिरी | १११ |
| ६३ पराया नारीसाठी | ११२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ६४ जहरी नाग बाई | ११४ |
| ६५ पिंजरा पडे सुना | ११५ |
| ६६ माहेरा जाते बाई | ११८ |
| ६७ आवळी आलो फुला | १२० |
| ६८ मंजुळ पायी बाजा | १२२ |
| ६९ पहिल्यानं गरवार | १२४ |
| ७० काय वहिनी मनात | १२५ |
| ७१ मैनाचे ओले केस | १२८ |
| ७२ फूल वाहते नाजुक | १२९ |
| ७३ राजा कसा भुलवला | १३० |
| ७४ लाल कुसुंबी पागोटो | १३२ |
| ७५ उभ्या मांडवाचे दारी | १३४ |
| ७६ माह्या आईनं म्हाणलं | १३६ |
| ७७ सासऱ्याला जाता | १३८ |
| ७८ सूर्या डोलला दिवसा | १४० |
| ७९ उदार सती जीवा | १४२ |
| ८० टांगा अंगणी बंगई | १४४ |
| ८१ हासत सख्या उभा | १४५ |
| ८२ नाव घे म्हाणकरिणी | १४६ |
| ८३ डोळे वाटेकडे राहे | १४८ |
| ८४ उभे महादेव पारावती | १४८ |
| ८५ कोण्या शेवट गतीला | १५० |

# दुसऱ्या आवृत्तीबद्दल थोडेसे—

कविवर्य पां. श्री. गोरे यांची 'वऱ्हाडी लोकगीते' यवतमाळच्या शारदाश्रम ग्रंथमालेचे १७ वे पुष्प म्हणून यवतमाळहून १९४२ साली प्रकाशित झाली होती. त्यावेळी हे पुस्तक दीड रुपयात दिले होते. प्रकाशक म्हणून श्री नारायण नागोराव हूड यांचे नाव होते व छपाई श्री. सोमेश्वर प्रेस अमरावतीचे प्रोप्रायटर श्री. प. वि. जोशी यांनी केली होती.

नागपूर विद्यापीठात लोकसाहित्याची प्रश्नपत्रिका स्नातकोत्तर अभ्यासक्रमात एकदोन वर्षांपूर्वी ठेवण्यात आली. तीत 'वऱ्हाडी लोकगीते' या पुस्तकाचा समावेश करण्यात आला. परंतु हे पुस्तक उपलब्ध नसल्याने आमच्या प्रकाशनाने याबाबत पुढाकार घेतला. इच्छा असूनही आर्थिक अडचणींमुळे हे पुस्तक लवकर काढता आले नाही.

या दुसऱ्या आवृत्तीसाठी दोन शब्द लिहावे अशी विनंती खुद्द कविवर्य पां. श्री. गोरे यांना केली. परंतु त्यांनी नम्रपणे कळविले ते असे— " पहिल्या पुस्तकास पूज्य आप्पासाहेब देशपांडे यांची मौलिक प्रस्तावना असल्यामुळे दुसरी प्रस्तावना असण्याची आवश्यकता नाही. सध्या प्रकृती म्हणण्यासारखी समाधानकारक नाही. "

या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीला श्री. नारायण नागोराव हूड यांनी लिहिलेले ' निवेदन ' व श्री. यशवंत खुशाल देशपांडे यांची दिलेली प्रस्तावना जशीच्या तशी या आवृत्तीत छापलेली आहे.

अमरावती,
ता. २ ऑक्टोबर १९७८.

— प्रकाशक

पाण्याला जाऊ गड्या !
उन्हानं झळकल्या
पाण्याला जाऊ गड्या !
पहा बुडाला दिवस !
पाण्याला जाऊ गड्या !
कोण चुनखडी मारी
पाण्याला जाऊ गड्या !
राहिली उभी गोरी
पाण्याला जाऊ गड्या !
कालवडी गवळ्यांच्या
पाण्याला जाऊ गड्या !
कोण हिरव्या शालूची
पाण्याला जाऊ गड्या !
कोणा पाहते राधिका
पाण्याला जाऊ गड्या !
जातो नीळकंठ गावा
पाण्याला जाऊ गड्या !
झरत ओली झाली
पाण्याला जाऊ गड्या !
आवळे झाले भारी
पाण्याला जाऊ गड्या !
लवे बारीक कंबर

बाई सांगड्या[1] सांगड्या !
हाती तारांच्या बांगड्या !
रस्त्याने वाल्या[2] वाल्या
कृष्णाच्या गाई आल्या
बंधुच्या अडावरी
पिंजेच्या नथीवरी !
कोण बाई ! अडावरी
बाजुबंद लहरा मारी !
सख्या एका तोलनीच्या,
सुना लेकी मालनींच्या
आपण नवत्या नारी
नटली गोपिका गोरी
पाणी भरती बायका
तिच्या मनात ओळखा
हारीनं या उभ्या राहा
साज रथाचा ग पहा !
अंधाऱ्या वडाखाली
लाल तिचा तो म्हाली !
गळचा सोनियाची सरी
पडते भुजीवरी !
नेस नवा पितांबर
चिऱ्या पडू दे शंभर !

---

१ सारख्या सारख्या २ अलग अलग

दमणीत बंधुराज    मागे बसला शालीचा !
जाता बहिणीच्या गावा नाही साउली झाडाची
राहे मजल इळाची[१]    तिच्या आवड गावाची !
बहिणीच्या जीवासाठी  पुरा वेडा पिसा झाला !
भोवताल झाडबन    थेट एकटा निघाला !
जाता बहिणीच्या गावी बाळी बांधली पिवळी !
राहे बहीण देशात    दूर दिल्लीच्या जवळी !
जाता बहिणीच्या गावी  वेट पडता गाडीचा
चाक टाकून रस्त्यात    जीन सवारे घोडीचा !
जाता बहिणीच्या गावी  बंधू इळाचा उपाशी
उन्हातान्हात चालला    कसा पायी कोसोकोसी
बहिणीचे जीवासाठी    गेला चाटयाच्या दुकानी
बोल बोलला चाटयाला  "काढ साड्या मिरादाणी"
बहिणीची बोळवण    करी भाऊ समरथ
पायी खासराच्या मागं    जाय गोऱ्हा हुंबरत !
बहिणीची बोळवण    भाऊ समरथ करी
राधा खुशालीत गेली    बोलून हासून घरी !
आपल्या घरी जाता    बहीण गुरमळे[२] !
तिचा मुकुंद बांधव    तिला घेऊन कवळे !
बहीण सार[३] केली    मागं परतले लोक
भाऊ जागचा हालेना !  भावाला बहीण एक !
बंधू बोळवण करी    गंगासागर साडीची[४]
हसे बहिणीच्या कुंकानी  हिरवे वेढ मनगटी !

---

१ वेळाची   २ घोटाळे   ३ बिदा केली   ४ एकप्रकारची साडी

## ४६. शेजारीण बाईस !

शेजी[१] सडा घाली गडे ! सड्याला जोडून
राजस बाळ माहा आला रांगोळी मोडून !
शेजारीण बाई ! शेजारधर्म राख
राजस बाळ माहा हिरा पदरानं झाक
शेजारीण बाई ! शेजार तुझा माझा !
निजला पाळण्यात लाडका शाहूराजा !
शेजारीण बाई ! पलंग जाळीपाशी
आहे निजून घरात बाळ माहा सुखवासी[२] !
शेजारीण बाई ! अंगण झाडू लाग
तुही मैना माहा राघू रोज खेळतील दोघं
शेजारीण बाई ! धन्य तुह्या संसाराची
झाले वर्ष बारा बाई ! नाही वाट माहेराची !
शेजारीण बाई ! नको करू नसनस [३]
दारी तुह्या गुलाबास येते फूल तोडायास
शेजारीण बाई ! तुहा शेजार सोन्याचा
येते तुहा राग बाई ! उगीर[४] बोलण्याचा !
शेजारीण बाई ! जळो तुहे ग नेतर[५]
वाळते आंगणात माह्या बाळाचं धोतर
शेजारीण बाई ! आवर तुही मैना
बोलका राघो माहा झाला एकाकी शाहणा !
शेजारीण बाई ! झाली जिवाची या माती !
लाडाची मैनावती कशाला मी धरू हाती ?

---

१ शेजारीण २ सुखलोलुप ३ किरकीर ४ वाईट ५ नेत्र

बापाने दिली लेक देऊन झाला चोर
जावई सावकार नाही खोलण्या उजूर !
उन्हाळ्याचं उन्ह ! तपे नागोण तणात !
लेकीचे मायबाप रोज जळती मनात !
कशी लेकीच्या बापानं लेकीची केली माती
दारी कसाबाच्या उभी केली गाय पाराव्रती !
लेकीच्या बावाजीनं लेकीचं केलं वन
दारी कसाबाच्या कशी गाय बांधली मोहन
वर्ष झाले बारा ! बाई पोरीच्या भेटीला
चोळी आंजिरी टांगून कशी ठेवली खुंटीला !
पडे अस्सलाची कार[1] कमशीलाचे कां हाती ?
जिवाची तिच्या माती डोळे रडून सुजती !
बापाने दिली लेक पाहिले न घरदार
लोटली धनावर केलं लेकीचं ना बरं !

* * *

म्हणे बाप "बाई ! तुला नाही दिली गोसाव्याला
पाहिला हुंडीवाला ! पालखी बसायाला !
काय करू बाई ! तुहं दैव ना चांगलं
लाल कुंकवानं पुरं नाही कपाळ रंगलं !

---

१ मक्ती

माह्या जीव गेला नको सांगू रे ! साजणा !
पिता बसला भोजना माता मांडल रोजना[१] !
माह्या जीव गेला लोकातोंडी "मेली मेली"
ऐका भ्रताराची बोली "राणी तिरथाला[२] गेली"
माह्या जीव गेला भितीच्या भासऱ्यानं
नाही झोप साऱ्यारात दिली मांडी भासऱ्यानं[३]
माह्या जीव गेला जन म्हणती "उचला"
पाठचा बंधुराज मांडी देऊन बसला !
माह्या जीव गेला वाटीत तावा तूप
पहा गोळणीचं बाई ! कसं झळकते रूप !
माह्या जीव गेला काशी गहिरे[४] साऱ्यारात
भरजरीचा पदर भिजला सवाहात !
माह्या जीव गेला लोक सारे काठोकाठी
माह्या मायेचा एकटा हातांनी माती लोटी !
माह्या जीव गेला भरला सारा वाडा
लाडाची आली मैना दारात भीड सोडा !
माह्या जीव गेला जन बसले कहीचे[५] !
वाट पाहता कोणाची वेळू उपसा गहीचे[६] !
माह्या जीव गेला अगीन भडकली !
जिवा भावाच्या धन्यानं सुपारी सडकली !

---

१ रोदना २ तीर्थाला ३ वडील दीराने ४ महिवरळी
५ केव्हाचे ६ वळचणीच्या गळीचे

## ५६. भाऊजी म्हणा " राम "

माह्या मरणाचे वेळी    माह्या मातेला बोलवा
गोड साखरेचं पाणी    टाका तोंडी द्या ओलावा !
माह्या मरणाचे वेळी    आयाबायांची दाटण
आली मायबाई माही    आत कवाड लोटून !
माह्या मरणाचे वेळी    जनां पडलं साकडं
बंधूच्या बागामंदी    चंदन बेलाचे लाकडं !
माह्या मरणाचे वेळी    म्हणे दीर 'चला नेऊ'
जाऊ बोलली आतून    " येऊ द्याना तिचे भाऊ "
माह्या मरणाचे वेळी    कुठं माय माही पाहू ?
सेव[1] सवारल माही    बहीण प्रीतीची जाऊ !
माह्या मरणाचे वेळी    रडल तो भाऊ धायी
समजाव शेजी बाई !    " बहीण एक नाही ! "
माह्या मरणाचे वेळी    घाई करतील लोक !
बोलल माही जाऊ    " तिचा येऊ द्या मालक "
माह्या मरणाचे वेळी    धाडा सांगून वावरी
शेला कमरेचा गेला    पित्याला माह्या भारी !
माह्या मरणाचे वेळी    कळल मातेला कसं
कडू लागला तोंडात    अन्नाचा पहिला घास !
माह्या मरणाचे वेळी    नका लावू वाजागाजा
ऊर कपाळ पिटून    माता रडल सारजा !
माह्या मरणाचे वेळी    जन नसता कोठ्यात !

---

१ पदर

देता हातात कंथाच्या बोलला तो ' शनिवार !'
रुसले भरतार सुकले हाती विडे !
सारी चिकण सुपारी लवंगा वाया दोडे !
रुसले भरतार लागते गोरी पाया
बोले " पिकल्या पानांचे नका धाडू विडे वाया !"
रुसले भरतार हाती अन्नकाची वाटी
उठली लगबग कंथाचे गेली भेटी
रुसले भरतार फुलांची शेज केली
पुढं पानांची गंगोळी विनंत्या करे गोरी !

* * *

रुसले भरतार राजाचे राज्य गेले
झाड करवती बाई ! वनी भयाण लागले !
रुसले भरतार राणीला देती रजा
लोकांच्या सांगोवांगी बाई ! बिघडला राजा !
रुसले भरतार नाही म्हणावा आपला
शेजीच्या लावणीनं लाल इंगुळ तापला !
रुसला भरतार कधी भोळा म्हणू नाही
नाग उयशाचा[1] काळा जहरी मोठा बाई !

## ६५. पिंजरा पडे सुना !

सासूचा सासुरवास नंदाबाईची लावणी !
कळ लावते येवोनी दीड दिसाची पाहुणी !

---

१ उशाचा

एवढा सासुरवास झाला रामाचे सीतेला
तेथून परिपाठ लागला दुनियेला !

* * *

भांडती सासासुना काय केले रे ! दुस्माना !
राघो वनात उडाला पिंजरा पडे सुना !

---

## ६६. माहेरा जाते बाई !

माहेरा मी जाते बाई ! बसीन पित्याच्यापाशी
गोष्ट ऐकीन हिताची देईल इसमा[1] काशी
माहेरा मी जाते बाई ! बसायला पाट पिढं
तूप सेवयाचं ताट भासा कवतीक पुढं !
माहेरा मी जाते बाई ! नाही जात राहायाला
चार दिवस सुखात माहेर ते भोगायाला
माहेरा मी जाते बाई ! मान कोणाचा पाहीन
सून पित्याची लहान माह्या बंधूची कामीण !
माहेरा मी जाते बाई ! धुते पाय माही माय
उभी राहते अंगणी गर्वानं भावजय !
माहेरा मी जाते बाई ! माहेर भोगायाला
मात्या माउलीच्या सुना रोज मला राबायाला
माहेरा मी जाते बाई ! माहेरी भाऊभासे
नांदे भरले गोकुळ वाडा आनंदाचा दिसे !

---

१ विसावा

नवसूतर ते दूध कसून मी पेली पुरी
माये ! तानपणी तुह्या बसून ग ! मांडीवरी !
दूध माऊलीचं कसं गोड अमृताचा डोणा
पिऊ वाटे बाई ! किती तृप्ती मनाची होईना !
तुह्या अंगातली चोळी झाली आंगी माह्या तंग !
माउली ! मी ग ! तुही गोड चवळीची शेंग !
तुह्या अंगातली चोळी माह्या आंगाला होईना !
झाली मायबाई तुह्या बरोबरीची मी मेना !
दळण हे दळताना आंगाच्या झाल्या गंगा !
माय ग माउलीनं मला चारल्या ..वंगा !
नाही भंगत दळणा बाह्या माह्या लोखडाच्या
घुटी माउलीनं माह्या पाजल्या ग ! व्यखडाच्या

* * *

बाई ! दळण सरलं सरली सरस्वती !
उभे अंगणात पाहा महादेव पारावती !

---

## ८५. कोण्या शेवट गतीला !

देवा नारायणा ! साऱ्या दुनियेला तू पावसी
कसा झाला रे ! निष्ठूर सांग बापा ! माह्याविशी ?
दुबळेपण हे देवा ! जाईल का धीरीधीरी
कधी होईल शाहणा नेणता हा माहा हरी

